या ६३ मजली इमारतीत पालिका प्रशासनाने सोमवारी अनधिकृत बांधकाम हटवण्याची कारवाई सुरू केली. आहे. यातील १२८ सदनिकाधारकांनी उद्वाहनाच्या (लिफ्ट) बाजूच्या सुमारे २००० चौरस फुटांच्या जागेवर अतिक्रमण करीत ती जागा सदनिकेत घेतली होती. याबाबतची तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये तात्कालीन अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांच्याकडे केली होती. त्यावर मार्च २०२६ मध्ये झालेल्या जनसुनावणीच्या वेळी जोशी यांनी याबाबतचे निष्कासनाचे आदेश दिले होते. त्यानुसार गेल्या चार महिन्यांत सदनिकांची पाहणी करून तक्रारीची पडताळणी करून सोमवारी पालिकेच्या जी दक्षिण विभाग कार्यालयाने तोडक कारवाई सुरू केली.

या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू) व अंमलबजावणी संचालनालयामार्फत (ईडी) चौकशी करण्याची मागणी तक्रारदार दौंडकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या प्रकल्पात २५० कोटी रुपयांहून अधिकच्या आर्थिक व्यवहारांमध्ये बेहिशेबी रकमेचा वापर झाल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे. याशिवाय, प्रकल्पातील पर्यावरणीय नियमांच्या पालनाबाबतही चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

### १२८ सदनिकांमध्ये अतिक्रमण!



या इमारतीत १२८ सदनिकांमध्ये अनधिकृत बांधकामे झाल्याची तक्रार आहे. या आधारे सोमवारी ३८ आणि ३९ व्या मजल्यावरील चार घरांवर कारवाई झाली. येथे शिवसेनेचे माजी आमदार सदा सरवणकर यांच्यासह काही मंत्र्यांची घरे असल्याने कारवाईला अधिक महत्त्व आले आहे.

## स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांनाही मराठी विभाग बंधनकारक

**मुंबई :** राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांमध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याबाबत आदेश दिले असून विद्यापीठांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी येथे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांच्या मंडळांचे अध्यक्ष आणि कुलगुरू यांची बैठक झाली. या वेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत इंटर्नशिप आणि चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रम अंमलबजावणीबाबत कार्यवाहीची माहिती घेण्यात आली.

# पश्चिम रेल्वेकडून ३९ स्टॉल बंद

## अन्न सुरक्षा नियम न पाळल्याने कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील हॉटेल, उपाहारगृहांतील स्वच्छता निकषांबाबत धडक कारवाई सुरू केलेली असतानाच पश्चिम रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक आदिश पठानिया यांनीही तशीच मोहीम रेल्वे स्थानकांवर राबविली. गेल्या दहा दिवसांत नियमभंग केल्याप्रकरणी मुंबई सेंट्रल विभागातील ३९ खाद्यपदार्थ स्टॉल बंद करण्यात आले असून ३१ ऑगस्टपर्यंत ही कारवाई सुरू राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पश्चिम रेल्वेकडून १५ ऑगस्टपासून ही मोहीम राबवली जात आहे. यावेळी बंद करण्यात आलेल्या ३९ पैकी २० स्टॉलने सर्व नियमांची पूर्तता केल्यानंतर आणि दंडाची रक्कम भरल्यानंतर ते पुन्हा सुरू करण्यात आले. यावेळी ३.८० लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दादर, बोरिवली, वापी, वलसाड, सुरत येथे हे स्टॉल आहेत.

### सीएसएमटीवर शिळा बर्गर!

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १४ जवळ असलेल्या ‘नमः वेटिंग लाउंज’च्या स्टॉलवर एका प्रवाशाने ६० रुपयांचा व्हेज बर्गर खरेदी केला. तो शिळा असल्याचे प्रवाशाच्या लक्षात आले आणि त्याला उलट्या होऊ लागल्या. प्रवाशाने तात्काळ स्टॉलवर जाऊन तक्रार केली असता, विक्रेत्याने त्याला ६० रुपये परत केले. त्यानंतर प्रवाशाने रेल मदत संपर्क क्रमांक १३९ वर तक्रार नोंदवली. तक्रार प्राप्त होताच मध्य रेल्वेच्या वाणिज्य निरीक्षकांनी घटनास्थळी चौकशी करून हे वातानुकूलित प्रतीक्षालय आणि तेथील स्टॉल ३० ऑगस्टपर्यंत बंद करण्याचे निर्देश दिले.

**मध्य रेल्वेचीही मोहीम**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात ५३ खानपान स्टॉलची तपासणी करण्यात आली. या वेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सहा स्टॉलवर कारवाई करून त्यापैकी तीन स्टॉल दहा दिवस बंद करण्यात आले.

# वीज मीटरसाठी लाच घेणारे दोघे अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** बांधकामाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात नवे विद्युत मीटर बसवून देण्यासाठी एक लाख ३० हजार रुपयांची लाच मागून त्यातील एक लाख २५ हजार रुपये घेताना दोन खासगी व्यक्तींना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. जयंता शिवकर व दर्शन साळवी अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

जयंता हा महावितरणमध्ये कंत्राटी रिक्षाचालक म्हणून कार्यरत असून दर्शन हा कंत्राटी वीजतंत्री (इलेक्ट्रीशियन) आहे. या दोघांविरोधात कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांचे कोपरी येथील मंगला विद्यालय परिसरात बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी तात्पुरत्या स्वरूपात नवे विद्युत मीटर बसवून घेण्यासाठी जयंता शिवकर व दर्शन साळवी यांनी तक्रारदाराकडे एक लाख ३० हजार रुपयांची लाच मागितली होती.

याबाबत तक्रारदाराने सोमवारी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास कोपरी परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने जयंता व दर्शन या दोघांनाही कारमध्ये बोलावले. यावेळी दोघांनी तक्रारदाराकडून एक लाख २५ हजार रुपयांची रोख रक्कम स्वीकारली. लाच स्वीकारताच पथकाने दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एसीबीच्या पथकाने दोघांना मंगळवारी दुपारी अटक केली.

# श्वानदंशाबाबत चुकीची माहिती दिल्याची डॉ. पगारे यांची कबुली

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली पालिकेच्या येथील रुक्मिणीबाई रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पगारे यांनी खडकपाडा भागातील श्वानदंशाची चुकीची माहिती दिल्याची कबुली प्रशासनाकडे दिली आहे. चुकीची माहिती देऊन भीतीचे वातावरण तयार करण्याचा कुठलाच उद्देश नव्हता. निवेदनामुळे तसे घडले असल्यास आपल्याला क्षमा करावी, असे वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पगारे यांनी पालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वरिष्ठांना दिलेल्या कारणे दाखवा नोटिसीतील उत्तरात म्हटले आहे.

१५ दिवसांपूर्वी खडकपाडा परिसरात एका पिसाळलेल्या श्वानाने एक दिवसात सुमारे ११० ते १३० नागरिकांचा चावा घेतल्याची माहिती डॉ. पगारे यांनी प्रसारमाध्यमांना दिली होती. त्यामुळे कल्याण-डोंबिवली शहरात खळबळ उडाली होती. यामुळे पालिकेचा वैद्यकीय आरोग्य विभाग टीकेचे लक्ष्य झाला होता.

**१७ जणांना चावा**

खडकपाडा भागात भटक्या श्वानाने दिवसभरात १७ जणांना चावा घेतला होता. रुक्मिणीबाई रुग्णालयात घटना घडल्याच्या दिवशी ५८ श्वानदंशाचे रुग्ण उपचार घेत होते. ही सर्व वास्तव स्थिती असताना डॉ. पगारे यांनी रुग्णालय व घटनास्थळावरील कोणतीही वास्तवदर्शी माहिती न घेता १३० जणांना श्वानदंश झाल्याची प्रतिक्रिया माध्यमांना दिली होती. वरिष्ठांशी चर्चा न करता अशा प्रकारे प्रतिक्रिया देऊन पालिका प्रशासनाची बदनामी केल्याबद्दल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी डॉ. पगारे यांना कारणे दाखवा नोटीस देऊन सात दिवसांत उत्तर देण्याचे कळवले होते.

# मुंबईतील आमदारांच्या विधिमंडळ कामगिरीत घट


**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील आमदारांच्या विधिमंडळातील कामगिरीत गेल्या काही वर्षांत लक्षणीय घसरण झाली असून पंधराव्या विधानसभेत मुंबईतील ३३ आमदारांची सरासरी कामगिरी ५५ गुणांवर आली आहे. १२ व्या विधानसभेत त्यांच्या गुणांची सरासरी ६१ इतकी होती. त्यामुळे आमदारांच्या सरासरी कामगिरीच्या श्रेणीत घट झाली असल्याचे नुकताच प्रजा फाउंडेशनकडून प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालानुसार दिसून येत आहे.

प्रजा फाउंडेशनकडून ‘मुंबईतील आमदारांचे रिपोर्ट कार्ड २०२६’ हा अहवाल मंगळवारी प्रकाशित करण्यात आला. यात हिवाळी अधिवेशन २०२४ ते पावसाळी अधिवेशन २०२५ या कालावधीत मुंबईतून निवडून आलेल्या आमदारांच्या कामगिरीचे विविध निकषांवर मूल्यमापन करण्यात आले आहे. सभागृहातील सहभाग, विचारलेले प्रश्न, प्रश्नांची गुणवत्ता, उपस्थिती आणि विधिमंडळातील एकूण कामगिरी आदी मुद्द्यांचा यात समावेश आहे.

या अहवालात प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, पंधराव्या विधानसभा कालावधीत केवळ २ हजार २१३ प्रश्न विचारण्यात आले. मात्र बाराव्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात (२००९ ते पावसाळी अधिवेशन २०१०) या कालावधीत एकूण ७ हजार ९५५ प्रश्न विचारण्यात आले होते. त्यामुळे आधीच्या तुलनेत पंधराव्या विधानसभेत आमदारांच्या प्रश्न संख्येत तब्बल ७२ टक्क्यांची घट झाली आहे, असे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे. त्यातही प्रश्नांच्या गुणवत्तेची सरासरी बाराव्या विधानसभेत ५० टक्क्यांवर होती. पंधराव्या विधानसभेत ते प्रमाण घसरून ३३ टक्क्यांवर आले आहे.

### प्रजा फाउंडेशनच्या अहवालातील निष्कर्ष



**काँग्रेसचे आमदार अव्वल**

अहवालाच्या क्रमवारीत काँग्रेसचे आमदार अमिन पटेल यांनी ८२.८९ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला आहे, तर काँग्रेसचे आमदार अस्लम शेख ८०.५८ गुणांसह दुसऱ्या, आणि ज्योती गायकवाड ८०.३० गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहेत. ३३ आमदारांपैकी केवळ तीन आमदारांना ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत.

# शाळांच्या वेळापत्रकात गणेशोत्सवाची भर

*(पान १ वरून)* निर्देश दिले आहेत. त्यानुसार शाळांमध्येही गणेशोत्सवापूर्वी विविध उपक्रम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शाळा सुरू झाल्यापासून बहुतांश शिक्षकांची निवडणुकीच्या कामासाठी बीएलओ म्हणून नियुक्ती केली होती. त्यापाठोपाठ शाळेतील एखाद-दुसरा शिक्षक वगळला तर सर्वच शिक्षकांची विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कामासाठी नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे सर्वच शिक्षक हे एसआयआरच्या कामासाठी शाळेबाहेर असल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झाला. एसआयआर पूर्ण झाल्याने शिक्षक पुन्हा शाळेत परतले असले तरी त्यांना विविध प्रशिक्षण व अहवाल पूर्ण करण्याचे काम तातडीने करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण करण्याऐवजी शिक्षकांना प्रशिक्षण व अहवालाची कामे करावी लागत आहेत.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी असे उपक्रम शाळांमध्ये राबविणे सरकारने बंद केले पाहिजेत. उपक्रम करायचेच असल्यास त्याचे नियोजन एप्रिलमध्ये सांगण्यात यावे. विद्यार्थ्यांमध्ये एका विशिष्ट धर्माचा प्रचार करणे हे चुकीचे आहे. त्यामुळे सरकारचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे.
**-गिरीश सामंत,** उपाध्यक्ष, दी शिक्षण मंडळ, गोरेगाव

शिकवायला हवा तेवढा वेळ मिळालेला नसताना पहिली घटक चाचणी तोंडावर आलेली आहे. शिकवायचे कधी, मूल्यमापनाची प्रक्रिया कशी राबवायची, असे प्रश्न शिक्षकांना सतावत आहे. त्यातच नवीन निर्णयामुळे शाळा व्यवस्थापनावरील ताण वाढणार आहे. हे उपक्रम ऐच्छिक ठेवावेत.
**- भाऊ चासकर,** शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते

शाळांवर विविध कार्यशाळा, स्पर्धा व उपक्रम लादणे योग्य नाही. सप्टेंबरमध्ये प्रथम घटक चाचणी नियोजित असून अनेक शाळांमध्ये अद्याप अभ्यासक्रम पूर्ण झालेला नाही. अशा परिस्थितीत गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध स्पर्धा व कार्यशाळांचे आयोजन करणे शिक्षक व विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण करणारे आहे.
**- जालिंदर सरोदे,** कार्याध्यक्ष, शिक्षक सेना, महाराष्ट्र

**वर्षभर विविध उपक्रम**

शिक्षकांना कृत्रिम प्रज्ञा (एआय) प्रशिक्षण, दिव्यांगांचे प्रशिक्षण, आनंदी शनिवारचे उपक्रम, नशामुक्ती अभियानाअंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन, ‘एक पेड माँ के नाम’ कार्यक्रम, विद्यार्थी, शिक्षक व शाळांची माहिती यू-डायसवर भरणे, विविध अहवाल पूर्ण करणे, विद्यार्थ्यांची ऑनलाइन उपस्थिती लावणे, परीक्षा पे चर्चासाठी विद्यार्थ्यांची नावनोंदणी, राज्य सरकारकडून आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांत सहभागी होणे, दर महिन्याला तीन ते चार जयंती किंवा पुण्यतिथीनिमित्त उपक्रम घेणे.

## इथेनॉल उद्योग वर्षभरासाठी ठप्प?

*(पान १ वरून)* ४० रुपयांहून जास्त राहिल्यास इथेनॉल उत्पादन करणे व्यवहार्य ठरत नाही. त्यामुळे कारखान्यांकडून साखर, साखरेचा पाक, उसाचा रस आदींपासून इथेनॉल उत्पादन केले जाणार नाही.

राज्यातील खासगी, सहकारी साखर कारखान्यांनी इथेनॉल प्रकल्पांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची आर्थिक गुंतवणूक केली आहे. साखर कारखान्यांच्या इथेनॉल प्रकल्पांना केंद्र सरकारने व्याज अनुदान दिले होते. केंद्र सरकारकडून सहा टक्क्यांवरील व्याजमाफी मिळत होती. केंद्र सरकारने प्रोत्साहन दिल्यामुळे पाच-सहा वर्षांत राज्यातील कारखान्यांची इथेनॉल उत्पादन क्षमता वार्षिक ३५० कोटी लिटरवर गेली आहे. पण, आता इथेनॉल उत्पादन करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणार नसल्यामुळे यंदा इथेनॉल प्रकल्प बंद राहण्याची शक्यता आहे.


**फोर्स मोटर्स लिमिटेड** FORCE
CIN : L34102PN1958PLC011172
नोंदणीकृत कार्यालय : मुंबई - पुणे मार्ग, आकुर्डी, पुणे - 411035.
दूरध्वनी क्रमांक : +91 (20) 27476381
ई-मेल : compliance-officer@forcemotors.com; वेबसाइट : www.forcemotors.com

**फोर्स मोटर्स लिमिटेडच्या 67 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, नोंदणी दिनांक आणि ई-मतदानाची (ई-व्होटिंग) माहिती**

**सूचना** (नोटीस) देण्यात येते की, **फोर्स मोटर्स लिमिटेडच्या ('कंपनी')** सभासदांची **67 वी वार्षिक सर्वसाधारण सभा** ('एजीएम') दिनांक **बुधवार, 16 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 3:00 वाजता (भा. प्र. वे.) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/इतर ऑडिओ व्हिज्युअल साधनांमार्फत ('OAVM')**, कॉर्पोरेट कार्य मंत्रालय (**'MCA'**) द्वारा, 22 सप्टेंबर 2025 रोजी प्रमाणित केलेल्या सामान्य परिपत्रक क्र. 03/2025 आणि सदर संदर्भीय एमसीए द्वारा जारी केलेल्या इतर संबंधित परीपत्रिकांच्या पालनानुसार (एकत्रितपणे **'MCA परिपत्रके'**), तसेच या संदर्भात सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (**'SEBI'**) द्वारा जारी केलेल्या संबंधित परीपत्रिकांस (एकत्रितपणे **'SEBI परिपत्रके'**) अनुसरुन, एजीएम नोटीसमध्ये नमूद केलेले व्यवहार पार पाडण्याकरिता आयोजित करण्यात येत आहे.

एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकानुसार, कंपनीने **मंगळवार, 25 ऑगस्ट 2026** रोजी ज्या सभासदांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी)/ रेजिस्ट्रार टू एन इशू अँड शेअर ट्रान्सफर एजन्ट (आरटीए) कडे नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सभासदांना एजीएमची नोटीस तसेच आर्थिक वर्ष 2025-26 चा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आला आहे. तसेच, ज्या सभासदांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत नाहीत, अशा सर्व सभासदांना आर्थिक वर्ष 2025-26 साठीचा वार्षिक अहवाल ज्या ठिकाणी उपलब्ध आहे त्याचा अचूक मार्ग सूचित करणारी वेब लिंक नमूद असलेले पत्र देखील पाठविण्यात आले आहे. आर्थिक वर्ष 2025-26 साठी एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइट https://www.forcemotors.com/ , BSE लिमिटेड (‘BSE’) च्या वेबसाइट https://www.bseindia.com/ , नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (‘NSE’) च्या वेबसाइट https://www.nseindia.com/ आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (‘NSDL’) च्या वेबसाइट https://www.evoting.nsdl.com/ वर उपलब्ध आहेत. एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद संदर्भिय कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर https://www.forcemotors.com/ वर तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

कंपनीच्या संचालक मंडळाने शिफारस केलेला लाभांश, जर एजीएममध्ये मंजूर झाला तर, सदर लाभांश देयता स्त्रोताच्या कर कपाती (‘TDS’) च्या अधीन असेल, जो एजीएमच्या तारखेपासून 30 दिवसांच्या कायदेशीर कालावधीत दिला जाईल. आयकर कायदा, 2025 ('आयकर कायदा') नुसार, कंपनीद्वारे दिलेला आणि वितरित केलेला लाभांश सभासदांच्या हाती करपात्र असतो आणि कंपनीला आयकर कायद्याप्रमाणे सभासदांना दिलेल्या लाभांशावर ठरवलेल्या दरानुसार टीडीएस कपात करणे आवश्यक असते.

सभासदांना विनंती केली जाते की, त्यांनी **MUFG Intime India Private Limited** च्या पोर्टलवर **बुधवार, 9 सप्टेंबर, 2026** रोजी **संध्याकाळी 5.00 वाजण्यापूर्वी (भा. प्र. वे.)** आवश्यक कागदपत्रे आरटीए कडे, सादर करावीत, जेणेकरून कंपनी योग्य TDS/विथहोल्डिंग कर निश्चित करून कपात करू शकेल. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे शेअर्स धारण केलेल्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी आपले नाव, पत्ता, मोबाइल नंबर, पॅन नंबर, मँडेट, नामांकन, कुलमुखत्यार पत्र, बँक तपशील यांमध्ये कोणतीही बदल असल्यास आवश्यक पुराव्यासह त्यांच्या संबंधित डीपीला कळवावे.

ज्या सभासदांकडे शेअर्स भौतिक (Physical) स्वरुपात आहेत, ते वरील तपशील कंपनीच्या आरटीए कडे MUFG Intime India Private Limited च्या sandip.pawar@in.mpms.mufg.com वर लिहून किंवा ई-मेलद्वारे, वैध पुरावे जोडून, नोंदवु / अद्ययावत करू शकतात, जेणेकरून त्यांना लाभांश थेट त्यांच्या बँक खात्यात मिळवता येईल.

**नोंदणी तारीख:** एजीएममध्ये लाभांश घोषित झाल्यास, लाभांश मिळण्यास पात्र असलेल्या सभासदांची यादी निश्चित करण्याहेतू, कंपनी कायदा कलम 91 आणि सेबी अधिनियम 42 च्या तरतुदीनुसार, कंपनीने बुधवार, 9 सप्टेंबर, 2026 हि 'नोंदणी तारीख' निश्चित केली आहे.

**ई-व्होटिंग:** कलम 108 आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, 2014 च्या नियम 20 तसेच लिस्टिंग अधिनियम (Listing Regulations) 44 नुसार, सूचनेत नमूद सर्व ठरावांवर ई-व्होटिंगच्या माध्यमातून मतदान करण्याची सुविधा सभासदांना एनएसडीएलच्या प्लॅटफॉर्मवर प्रदान केली आहे. या संदर्भात, सभासदांना पुढील माहिती देण्यात येत आहे की:

(1) एजीएमच्या नोटिसमध्ये नमूद केलेले सामान्य आणि विशेष ठराव रिमोट ई-व्होटिंग (दूरस्थ ई-मतदान) आणि एजीएममधील ई-व्होटिंग पद्धतीने पार पाडले जातील.
(2) रिमोट ई-व्होटिंग शनिवार, 12 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 9:00 वाजता (भा. प्र. वे.) सुरु होईल आणि मंगळवार, 15 सप्टेंबर 2026 रोजी संध्याकाळी 5:00 वाजता (भा. प्र. वे.) संपेल.
(3) रिमोट ई-व्होटिंग मंगळवार, 15 सप्टेंबर 2026 रोजी संध्याकाळी 5.00 वाजता (भा. प्र. वे.) नंतर एनएसडीएलद्वारे अक्षम केले जाईल, आणि त्यानंतर ई-व्होटिंग साठी परवानगी दिली जाणार नाही.
(4) ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या नोंद रजिस्टर किंवा डीपीकडून राखल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदणी रजिस्टर मध्ये बुधवार, 9 सप्टेंबर, 2026 रोजी म्हणजे कट-ऑफ तारखेस नोंदवलेले आहे, तीच व्यक्ती रिमोट ई-व्होटिंग सुविधेद्वारे किंवा एजीएम मध्ये ई-व्होटिंग करण्यास पात्र राहील.
(5) ज्या व्यक्ती, कंपनीने एजीएमची नोटीस प्रसारित केल्यानंतर कंपनीचे समभाग खरेदी करून सभासद होतात, अथवा कट-ऑफ तारखे दिवशी म्हणजेच बुधवार, 9 सप्टेंबर, 2026 रोजी सभासद बनतात, असे सभासद आपला लॉगिन आयडी आणि पासवर्ड evoting@nsdl.com किंवा sandip.pawar@in.mpms.mufg.com किंवा compliance-officer@forcemotors.com या ई-मेलवर विनंती पाठवून मिळवू शकतात.
(6) रिमोट ई-व्होटिंग द्वारे मतदान केल्यानंतर सभासद एजीएम मध्ये सहभाग घेऊ शकतात परंतु परत एजीएम मध्ये पुन्हा ई-व्होटिंग करू शकत नाहीत.
(7) एजीएम मध्ये ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध केली जाईल व ज्या सभासदांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिलेले नाही त्यांनाच एजीएम मध्ये ई-व्होटिंगद्वारे मतदान करता येईल.
(8) ई-व्होटिंग संदर्भातील कोणत्याही चौकशी, शंका / तक्रारीसाठी, कृपया खालील व्यक्तींशी संपर्क साधा किंवा www.evoting.nsdl.com या वेबसाइट वरील डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (‘FAQs’) आणि ई-व्होटिंग मॅन्युअल पुस्तिका पहा:

**श्री. सागर गुधाते, वरिष्ठ व्यवस्थापक, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड,**
पत्ता : ट्रेड वर्ल्ड, चौथा मजला, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - 400 013. ई-मेल आयडी: evoting@nsdl.com, संपर्क क्रमांक: +91 22 4886 7000
**श्री. रोहन संपत, कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी, फोर्स मोटर्स लिमिटेड,**
पत्ता : मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - 411 035.
ई-मेल आयडी: compliance-officer@forcemotors.com,
संपर्क क्रमांक: +91 20 2747 6381

आर्थिक वर्ष 2025-26 चा वार्षिक अहवाल आणि 67व्या एजीएम ची नोटीस प्राप्त करण्यासाठी, भौतिक (Physical) स्वरूपातील भागधारक/ सभासद ज्यांनी आपला ई-मेल पत्ता आणि मोबाईल नंबर नोंदवलेले नाहीत, त्यांनी कंपनीकडे सदर माहिती नोंदवण्यासाठी compliance-officer@forcemotors.com किंवा sandip.pawar@in.mpms.mufg.com या ई-मेलवर स्वप्रमाणीत पॅन (PAN) ची स्कॅन केलेली प्रत, योग्यरित्या भरलेला आणि सही केलेला फॉर्म ISR-1 पाठवून सदर माहितीची नोंद करून घ्यावी. तसेच, डी-मॅट स्वरूपातील भागधारकांनी आपला ई-मेल पत्ता संबंधित डीपी कडे नोंदवून/अद्ययावत करून घ्यावा हि विनंती.

तुम्हाला कंपनीद्वारे वेळोवेळी करण्यात येणारा संपर्क व्यवहार प्राप्त होण्यासाठी कंपनीकडे अथवा तुमच्या डीपी कडे तुमच्या सर्वात जास्त अद्ययावत ई-मेल आयडी ची कृपया नोंदणी करावी.

सभासदांना विनंती आहे की, त्यांनी एजीएमच्या सूचनेतील सर्व नोट्स आणि विशेषत: एजीएम मध्ये सामील होण्याच्या सूचना आणि ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**फोर्स मोटर्स लिमिटेड करिता**
**रोहन संपत**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
पुणे
26 ऑगस्ट 2026
*** टीप: स्वैर मराठी अनुवाद, सर्व कायदेशीर बाबींकरिता इंग्रजीतील नोटीसच ग्राह्य धरली जाईल**



HEXAGON NUTRITION
*Nutritionally Yours...*
**हेक्सागॉन न्यूट्रिशन लिमिटेड**
**सीआयएन:** L24110MH1993PLC072189
**नोंदणीकृत कार्यालय:** ४०४, ग्लोबल चेंबर, आदर्श नगर, लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५३, **संकेतस्थळ:** www.hexagonnutrition.com
**ई–मेल:** cs.hnpl@hexagonnutrition.com

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / इतर दृक–श्राव्य माध्यमांद्वारे आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत भागधारकांसाठी सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, (’कंपनी’च्या) सदस्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (’व्हीसी ’) किंवा इतर दृक–श्राव्य माध्यमांद्वारे (’ओएव्हीएम’) आयोजित केली जाईल. या सभेत, सभा बोलावण्याबाबतच्या सूचनेत तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे सामान्य आणि विशेष कामकाज पार पाडले जाईल.

सदस्यांनी नोंद घ्यावी की, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२०, परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे २०२० आणि त्यानंतरच्या विविध परिपत्रकांद्वारे, ज्यापैकी सर्वात नवीन संदर्भ क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ आहे आणि वेळोवेळी जारी केलेल्या अशा इतर संबंधित परिपत्रकांद्वारे (सामूहिकपणे ‘एमसीए परिपत्रके‘ म्हणून संदर्भित), सेबी (प्रतिभूती आणि विनिमय मंडळ, भारतीय) (‘सेबी परिपत्रक‘), कंपन्यांना व्हीसी/ओएव्हीएम माध्यमातून वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) आयोजित करण्यास आणि आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या वार्षिक अहवालासोबत वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सदस्यांना आणि इतर पात्र व्यक्तींना, ज्यांचे ई–मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना ई–मेलद्वारे पाठवण्यास परवानगी दिली आहे.

कंपनी कायदा, २०१३ आणि एमसीए परिपत्रकांनुसार, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता (भाप्रवे) केवळ ’व्हीसी/ओएव्हीएम’ द्वारे आयोजित केली जाईल. सदस्य या सभेत केवळ ’व्हीसी/ओएव्हीएम’ सुविधेद्वारेच उपस्थित राहू शकतील आणि सहभागी होऊ शकतील (याबाबतचा तपशील सभेच्या सूचनेमध्ये समाविष्ट आहे); एमसीए परिपत्रकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी, या सभेत प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची किंवा सहभागी होण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. ’व्हीसी/ओएव्हीएम’ द्वारे सभेत सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अन्वये ’कोरम’ (गणपूर्ती) निश्चित करण्याच्या उद्देशाने केली जाईल. मतदान करण्यास पात्र असलेल्या सदस्यांसाठी कंपनी ’ई–व्होटिंग’ची (रिमोट आणि एजीएम दरम्यान) सुविधा उपलब्ध करून देईल.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) आणि वार्षिक अहवालाबाबत सूचना**

आर्थिक वर्ष २०२५ – २०२६ साठीच्या एकात्मिक वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना केवळ त्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवली जाईल, ज्यांचे ई–मेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (’रजिस्ट्रार’) / डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकानुसार, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेच्या आणि वार्षिक अहवालाच्या कोणत्याही भौतिक प्रती कोणत्याही सदस्याला पाठवल्या जाणार नाहीत. कंपनीच्या सर्व सदस्यांसाठी, ही माहिती आणि संदर्भाकरिता कंपनीच्या वेबसाइट https://hexagonnutrition.com/, बीएसई लिमिटेड (www.bseindia.com), नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) आणि एनएसडीएल वेबसाइट (www.evoting.nsdl.com) यांच्या संकेतस्थळांवर सदस्यांच्या माहितीसाठी आणि संदर्भासाठी उपलब्ध असतील.

**ई–मेल पत्ता नोंदवण्याची / अद्ययावत करण्याची पद्धत:**

ज्या भागधारकांकडे शेअर्स ’फिजिकल’ (प्रत्यक्ष प्रमाणपत्र) किंवा ’डीमॅट’ (इलेक्ट्रॉनिक) स्वरूपात आहेत आणि ज्यांनी आपला ई–मेल पत्ता त्यांच्या ’डिपॉझिटरी पार्टिसिपंट’कडे (डीपी) अद्याप नोंदवलेला किंवा अद्ययावत केलेला नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी लवकरात लवकर तसे करावे; जेणेकरून त्यांना वार्षिक अहवाल आणि ई–मतदानाशी संबंधित तपशील प्राप्त होऊ शकतील. ई–मेल पत्ता खालीलप्रमाणे अद्ययावत करता येईल:

| डीमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य | प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य |
|---|---|
| आपल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे (डीपी) आपला ई–मेल पत्ता आणि पॅन क्रमांक अपडेट करणे | कृपया आपला फोलिओ क्रमांक, ई–मेल आयडी, मोबाईल क्रमांक आणि पॅन क्रमांक तसेच विनंती पत्राची स्वाक्षरी केलेली प्रत खालील पत्त्यावर ई–मेलद्वारे पाठवावी:<br>आनंदन के. (सहाय्यक उपाध्यक्ष)<br>सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२ \| फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा \| सेरिलिंगमपल्ली मंडल \| हैदराबाद – ५०००३२ \| भारत<br>ई–मेल: einward.ris@kfintech.com<br>दूरध्वनी क्र.: +९१–४०–६७१६२२२२ |

जर तुमचा ई–मेल पत्ता कंपनीकडे किंवा डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत असेल, तर ’रिमोट ई–व्होटिंग’साठी (दूरस्थ ई–मतदानासाठी) आवश्यक असलेली लॉग–इन माहिती तुमच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठवली जात आहे. कृपया लक्षात घ्या की, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सहभागी होण्यासाठी आणि सभेदरम्यानच्या ठरावांवर मतदान करण्यासाठी याच लॉग–इन माहितीची आवश्यकता असेल.

**एजीएम मधील मतदानाची पद्धत (रिमोट ई–व्होटिंग आणि एजीएम दरम्यान ई–व्होटिंग)**

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी, कंपनी आपल्या सर्व सदस्यांना एनएसडीएल ची ई–व्होटिंग सुविधा (ज्यामध्ये ‘रिमोट ई–व्होटिंग‘चा समावेश आहे) उपलब्ध करून देताना आनंद व्यक्त करत आहे. सदस्य एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या विषयांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील; हे मतदान एकतर रिमोटली (रिमोट ई–व्होटिंग कालावधीत) किंवा एजीएम दरम्यान (अध्यक्षांच्या सूचनेनुसार ई–व्होटिंगची सुविधा सुरू केल्यावर) करता येईल.

वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बोलावण्याची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे सदस्य झालेले आणि ’कट–ऑफ’ तारखेला शेअर्स धारण करणारे व्यक्ती evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून ’लॉगिन आयडी’ आणि पासवर्ड मिळवू शकतात. तथापि, जर अशी व्यक्ती ई–व्होटिंगसाठी एनएसडीएल कडे आधीच नोंदणीकृत असेल, तर ती व्यक्ती मतदान करण्यासाठी आपला विद्यमान ’युजर आयडी’ आणि पासवर्ड वापरू शकते.

काही शंका असल्यास, आपण www.evoting.nsdl.com च्या ’डाउनलोड’ विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे ’वारंवार विचारले जाणारे प्रश्न’ आणि ’ई–व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका’ पाहू शकता; किंवा १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० या क्रमांकांवर कॉल करू शकता; तसेच evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवू शकता आणि/किंवा cs.hnpl@hexagonnutrition.com वर संपर्क साधू शकता.

ई–मतदान आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सहभागी होण्याबाबतच्या सूचना या सभेच्या प्रक्रियेचाच एक भाग असतील. कंपनीची सूचना कंपनीच्या तसेच एनएसडीएल आणि स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल. एमसीए च्या परिपत्रकांचे पालन करून आणि सदस्यांच्या माहितीसाठी ही जाहिरात प्रसिद्ध केली जात आहे; ही माहिती स्टॉक एक्स्चेंज आणि कंपनीच्या संकेतस्थळांवरही उपलब्ध आहे.

आम्ही सर्व सदस्यांना विनंती करतो की, एजीएम ची सूचना, वार्षिक अहवाल आणि ई–मतदानासाठी आवश्यक तपशील (लागू असल्यास) प्राप्त करण्यासाठी त्यांनी आपली माहिती लवकरात लवकर अद्ययावत करावी.

**हेक्सागॉन न्यूट्रिशन लिमिटेड** करिता
सही/–
**विक्रम केळकर**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०२३०२३६४
स्थळ: मुंबई
दिनांक: २६ ऑगस्ट, २०२६